मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२






# शहरातील 27 विसर्जन घाटांवर जीव रक्षकांची नियुक्ती!

## गणेश विसर्जन काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी अग्निशमन विभागाकडून विशेष तयारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. गणेशोत्सवाला २७ ऑगस्टपासून सुरुवात झाली असून हा उत्सव ६ सप्टेंबर २०२५ पर्यंत चालणार आहे. या काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी महापालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत विशेष उपाययोजना आखण्यात आल्या आहेत.



गणेशोत्सव काळात विसर्जन घाटांवर होणारी गर्दीची शक्यता लक्षात घेता, दुर्घटना टाळण्यासाठी अग्निशमन दल व आपत्ती व्यवस्थापन विभागाने व्यापक नियोजन केले आहे. पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील २७ अधिकृत गणेश विसर्जन घाटांवर सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. प्रत्येक घाटावर जीव रक्षकांसाठी लागणारे साहित्य लाईफ जॅकेट, लाईफ रिंग, दोरी, मेगाफोन इत्यादी उपलब्ध करून देण्यात आले आहे. घाटावरील जीव रक्षक नागरिकांना सहज ओळखता यावेत, यासाठी त्यांना अग्निशमन विभागाकडून दिलेले ॲप्रन परिधान करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापनासाठी अग्निशमन दलाच्या वाहनांसह रबर बोट, पथक आणि संपर्क अधिकारी घाट परिसरात सुसज्ज ठेवण्यात आले आहेत.

दरम्यान, विसर्जन घाटांवर नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टिने काळजी घ्यावी. गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी घाटावर गेल्यानंतर नदीपात्रात उतरू नये, लहान मुलांना पाण्याजवळ एकटे सोडू नये, तसेच रेस्क्यू पथक व पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन अग्निशमन विभागामार्फत करण्यात आले आहे.

### जीव रक्षक पथकांचे समन्वय अधिकारी

- किवळेगाव (पवनानदी), रावेत घाट (जलशुद्धीकरण केंद्र), रावेत भोंडेवस्ती (मळेकर) – अनिल डिंबळे – ७२६२०२३३२०
- पुनावळे गाव (राममंदिर), ताथवडे स्मशान घाट, वाल्हेकरवाडी जाधव घाट, प्राधिकरण तळे (गणेशतलाव) – गौतम इंगवले – ९२७०३१६३१६
- थेरगाव पूल नदीघाट, मोरया गोसावी पवना नदी, केशवनगर (चिंचवड घाट) – चंद्रशेखर घुळे – ९९२२२५७९८५
- पिंपरी स्मशानभूमी घाट, सुभाषनगर घाट, काळेवाडी स्मशान घाट – बाळासाहेब वैद्य – ९८२२७७४०४९
- काटेपिंपळे घाट, पिंपळे गुरव घाट, पिंपळे निळख घाट, वकड गावठाण घाट, कस्पटे वस्ती घाट – विजय घुगे – ८८८८८३७५४३
- सांगवी स्मशान घाट, सांगवी दशक्रिया घाट, सांगवी वेताळबाबा मंदिर घाट – सुनील फरांदे – ७३८१८१२७०१
- कासारवाडी स्मशानभूमी घाट, फुगेवाडी स्मशानभूमी घाट, बोपखेल घाट – दिलीप गायकवाड – ९७६७३०५३२४
- चिखली स्मशान घाट, मोशी नदीघाट – विनायक नाळे – ९३७०९१५५७६
- मोशी खाण (इ) प्रभाग – विकास नाईक – ९८५०८९०४०३

# दुर्दम्य आत्मविश्वास आणि आप्तेष्टांचा पाठिंबा हेच यशाचे गमक

## पद्मश्री शितल महाजन यांनी विद्यार्थ्यांना दिला कानमंत्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त दिग्गज हॉकीपटू ध्यानचंद यांचा जन्मोत्सव साजरा केला जात असताना, एस.बी. पाटील पब्लिक स्कूलने आणि पद्मश्री (2011) शितल महाजन यांनी हॉकीपटू ध्यानचंद यांना श्रद्धांजली अर्पण केली आणि या कल्पनेला बळकटी दिली की खरी क्रीडा भावना क्षेत्राच्या आणि आखाड्यांच्या पलीकडे जाते. ज्यामध्ये धैर्य, महत्त्वाकांक्षा आणि असाधारण ध्येयांचा पाठलाग यांचा समावेश आहे.

प्रमुख पाहुणे परिचय - उत्तर आणि दक्षिण ध्रुवावर विक्रमी स्कायडायव्हिंगसाठी प्रसिद्ध असलेल्या शितल महाजन यांनी साहसी खेळांमध्ये भारतातील सर्वोच्च मान्यता मिळवली आहे, ज्यात तेनझिंग नोर्गे राष्ट्रीय साहस पुरस्कार (२००६) आणि फेडरेशन एरोनॉटिक इंटरनॅशनल कडून एफएआय सबिहा गोकेन पदक (२०१८) यांचा समावेश आहे.

दोन्ही ध्रुवांवरून स्कायडायव्ह करणारी ती सर्वात तरुण महिला आहे, ३०,५०० फूट उंचीवरून HALO जंप करणारी पहिली भारतीय महिला आहे आणि विंगसूट आणि उच्च-उंचीवरील पॅराशूट लँडिंगची प्रणेती आहे. त्यांचा असाधारण प्रवास, धाडसी पहिला अनुभव आणि जागतिक स्तरावर प्रशंसा मिळवून, देशभरातील इच्छुक साहसी लोकांना प्रेरणा देत आहे.

शाळेच्या नेतृत्व गटाने त्यांचे स्वागत केले प्राचार्य डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्य पद्मावती बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी, आणि प्रशासकीय व्यवस्थापक श्री. मनीष ढेकळे.



मुख्याध्यापिका आणि उपप्राचार्यांशी थोडक्यात संवाद साधल्यानंतर शितल महाजन यांनी त्यांचा साहसी प्रवास आणि आवड सांगितली, त्यांना सभागृहात नेण्यात आले जिथे इयत्ता आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. शाळेच्या विद्यार्थी परिषदेच्या सदस्यांनी त्यांची ओळख करून दिली, त्यानंतर त्यांच्या कामगिरीचा नऊ मिनिटांचा व्हिडिओ दाखवण्यात आला, ज्यामध्ये प्रत्येक उल्लेखनीय कामगिरीचे प्रत्यक्ष वर्णन केले गेले. विद्यार्थी आणि शिक्षक विस्मय आणि कौतुकाने भारावून गेले.

त्यानंतर त्यांच्यासमोरील आव्हाने आणि प्रत्येक अडथळ्यावर कशी मात केली यावर प्रेरणादायी भाषण केले. शेवटी विद्यार्थी आणि शिक्षकांनी त्यांना प्रश्न विचारले, ज्यांची प्रामाणिकपणे आणि प्रेमाने उत्तरे दिली. त्यानंतर राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या समारंभाचे साक्षीदार होण्यासाठी क्रीडा मैदानावर नेण्यापूर्वी प्राचार्य डॉ. सैनी यांनी शितल महाजन यांचा सत्कार केला.

उद्घाटन समारंभात विद्यार्थ्यांनी गाणी, नृत्य आणि मार्शल आर्ट्सच्या माध्यमातून त्यांच्या प्रतिभेचे प्रदर्शन केले. पुन्हा एकदा, शितल महाजन यांनी उपस्थितांना संबोधित केले, यावेळी इयत्ता पाचवी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांशी बोलताना, त्यांनी उत्साहाने त्यांच्याशी संवाद साधला, प्रश्न विचारले त्यांची उत्तरे त्यांनी प्रोत्साहन आणि उत्साहाने दिली.

तसेच, विद्यालयातर्फे हा अत्यंत स्तुत्य कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल एस. बी. पाटील पब्लिक स्कूल च्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी यांनी कार्यकारी संचालक डॉक्टर गिरीश देसाई सरांचे विशेष आभार मानले.

# जाधववाडीतील चढावर पुन्हा तीच दुर्घटना



**पिंपरी | प्रतिनिधी**

धोकादायक चढावर पुन्हा एकदा अपघाताची पुनरावृत्ती झाली असून, नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. मागील पाच दिवसांपूर्वी ट्रकमधून लोखंडी सळ्या रस्त्यावर कोसळल्या. सुदैवाने ट्रकच्या मागे कोणतेही वाहन नसल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र अशा दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने दुर्लक्ष करून चालणार नसल्याच्या भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

सावतामाळी मंदीर ते आहेरवाडी चौकापर्यंत तीव्र चढ असल्याने अवजड वाहने घसरण्याच्या घटना घडल्या आहेत. याआधीही महिन्यापूर्वीच अशी घटना घडली असून, वारंवार अपघात होत असूनही महापालिका स्थापत्य विभाग आणि पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष कायम आहे. एखाद्याचा बळी गेल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा प्रश्न संतप्त नागरिक विचारत आहेत. चिखली-कुदळवाडी रस्त्यावर अवजड वाहनांना पूर्ण बंदी घालावी, असा नागरिकांचा सातत्याने आग्रह आहे.

या परिसरात दाट नागरी वस्ती आहे. मोठमोठ्या शाळांमुळे विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे त्वरित उपाययोजना करण्याची गरज आहे. महिनाभरामध्ये दोन वेळा या चढावर अपघात झाले आहेत. महापालिका प्रशासन अन् पोलिस प्रशासनाने तत्काळ लक्ष घालून या चढाची तीव्रता व उताराची तीव्रता कमी करावी अशी मागणी जाधववातीली ग्रामस्थ विशाल आहेर, प्रदीप आहेर, सुभाष धायरकर, संतोष जाधव, हनुमंत जाधव यांच्यासह इतर ग्रामस्थांनी केली आहे.

# खड्ड्यांच्या तक्रारींसाठीची ॲपच 'खड्ड्या'त

## गाजावाजा करून सुरू केलेल्या ॲपमध्ये माहिती नोंदविणे दुर्लभ होत असल्याच्या तक्रारी

**पुणे | प्रतिनिधी**

रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांच्या तक्रारी करण्यासाठी महापालिकेने तयार केलेल्या 'पीएमसी रोड मित्र' या मोबाईल ॲपमध्ये अडचणी निर्माण होत आहेत. या ॲपवरून तक्रारी नोंदविताना त्रास होत असून, खड्ड्यांचे फोटो, माहिती नोंदविता येत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. तक्रारी नोंदविण्याचा वारंवार प्रयत्न करूनही ॲपमध्ये त्याची नोंदच होत नसल्याने नागरिकांच्या त्रासात अधिकच भर पडत आहे.



शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांची तक्रार थेट महापालिकेकडे करता यावी, यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या सूचनेनंतर पथ विभागाने 'पीएमसी' रोड मित्र हे मोबाईल ॲप सुरू केले आहे. यामध्ये नागरिकांना खड्ड्यांचे फोटो, व्हिडिओ अपलोड करून तक्रार करता येत आहे. तक्रार करताना यामध्ये अक्षांश-रेखांश येत असल्याने तक्रारीची दखल घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी महापालिकेला सविस्तर माहिती मिळते. हे मोबाईल ॲप सध्या ॲंड्रॉइड मोबाइलसाठी 'प्ले स्टोअर'वर उपलब्ध आहे. या ॲपला पथ विभागाच्या सर्व अभियंत्यांची माहिती संलग्न करण्यात आली आहे.

महापालिकेने तक्रारी नोंदविण्यासाठी सुरू केलेल्या या मोबाईल ॲपला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या ॲपवर अधिकाऱ्यांची माहिती देण्यास आल्याने तक्रार नोंदविल्यानंतर ज्या भागातील ही तक्रार आहे. तेथील संबंधित कनिष्ठ अभियंत्याकडे ही तक्रार जाते. तसेच, पथ विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे असलेल्या डॅशबोर्डवरदेखील ही माहिती समजते. त्यामुळे तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर वचक बसला आहे. तक्रार नोंदविल्यानंतर संबधित तक्रारदाराकडे ज्या अधिकाऱ्याकडे तक्रार गेली आहे. त्याची माहितीदेखील एसएमएस द्वारे संबधित तक्रारदार नागरिकाला कळविली जाते.

गेल्या काही दिवसांपासून या ॲपमध्ये तक्रार नोंदविताना अनेक समस्या येत आहेत. हे ॲप सुरू केल्यानंतर त्यात थोडी माहिती भरली, की लगेच हे ॲप बंद पडत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. तसेच, यापूर्वी केलेल्या तक्रारींची दखल महापालिकेच्या पथ विभागाकडून घेतली जात नसल्याचा आरोपही होत आहे. काही घटनांमध्ये तक्रार करताना नागरिक खड्ड्याऐवजी दुसरेच फोटो ॲपवर टाकत असल्याने पथ विभागातील कर्मचारी, अधिकारी यांची डोकेदुखी देखील वाढली आहे. दरम्यान, या ॲपबाबत समस्या नसल्याचे महापालिकेच्या पथ विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

> तांत्रिक अडचणींमुळे काही वेळेस ॲपमध्ये तक्रार नोंदविताना वेळ लागत असेल. मात्र, हे ॲप सुरू आहे. नागरिकांना काही अडचणी येत असतील, तर त्यांनी तातडीने पथ विभागाशी संपर्क साधावा. त्यांच्या अडचणी सोडविल्या जातील.
>
> **– अनिरुद्ध पावसकर, मुख्य अभियंता, पथ विभाग**

# जिल्ह्यातील उपनद्या, नाल्यांतील पाण्यावरही प्रक्रिया

## सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती; नद्या प्रदूषणमुक्त करण्याचा निर्धार

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील प्रमुख नद्या प्रदूषणुक्त करण्यासाठी मोठ्या नद्यांना मिळणाऱ्या उपनद्या आणि नाल्यांवरील पाण्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली जाईल, अशी माहिती सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शुक्रवारी दिली.




जिल्हा विकास समन्वय आणि सनियंत्रण समितीची (दिशा) आढावा बैठक शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. त्यावेळी मोहोळ बोलत होते. राज्याच्या नगरविकास आणि सामाजिक न्याय विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, वडगावशेरीचे आमदार बापूसाहेब पठारे, खेडचे आमदार बाबाजी काळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखरसिंह, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह अन्य विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्यात सुरू असलेले रस्ते विकास, पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय आणि कल्याण विभागाच्या योजनांचा या बैठकीत आढावा घेण्यात आला. केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील समन्वय वाढविण्याची सूचना यावेळी करण्यात आली. 'औद्योगिक, शैक्षणिक तसेच माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात देशात जिल्हा अग्रस्थानी आहे. जिल्ह्यातील जलप्रदूषणाचा प्रश्न गंभीर होत आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील गटारातील तसेच औद्योगिक सांडपाणी थेट नद्यांमध्ये मिसळल्याने पाणी प्रदूषण वाढले आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून प्रकल्प उभारले जात आहेत. मात्र, प्रमुख नद्यांवरच प्रकल्प उभारून उपयोग होणार नाही, तर उपनद्या, नाले आणि गटार पाण्यावरही शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया होणे अत्यावश्यक आहे,' असे मोहोळ यांनी सांगितले.

मोहोळ म्हणाले, 'स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पुणे जिल्हा परिषदेकडून १० नवे प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. यामुळे कचरा व्यवस्थापन, मल:निस्सारण तसेच स्वच्छता उपक्रमांना चालना मिळून पर्यावरण संतुलन साधण्यास मदत होणार आहे. नदी स्वच्छता, शाश्वत कचरा व्यवस्थापन, हरित ऊर्जा निर्मिती, ग्रामीण विकास आणि शहरी भागातील मूलभूत सुविधा या सर्वच क्षेत्रांमध्ये कार्यक्षम आणि पारदर्शक अंमलबजावणीला जिल्हा विकास समितीचे प्राधान्य आहे.'

### मेट्रोच्या विस्ताराला लवकरच गती

» शहरातील रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी पुणे मेट्रो उपयुक्त ठरत आहे. जुलैमध्ये एक लाख ९२ हजार प्रवाशांनी मेट्रोतून प्रवास केला. ऑगस्टमध्ये ही संख्या २ लाख १३ हजार एवढी झाली आहे. सध्या मेट्रोच्या विस्तारीकरणाचे प्रस्ताव वेगवेगळ्या टप्प्यावर आहेत. त्याची तांत्रिक तपासणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील कामे सुरू होतील. त्यादृष्टीने या कामांना गती द्यावी, अशी सूचनाही केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

# महापालिकेच्या प्रभाग रचनेवर 380 हरकती

## खराडी येथील थिटे वस्तीतील तब्बल 130 नागरिकांनी एक सारखीच हरकत



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर आत्तापर्यंत केवळ ३८० हरकती आलेल्या आहेत. बहुतांश हरकती या खराडी आणि सिंहगड रस्त्यांवरील प्रभागांमधील आहेत. खराडी येथील थिटे वस्तीतील तब्बल १३० नागरिकांनी एक सारखीच हरकत दाखल केली आहे. दरम्यान गणेशोत्सव सुरु असल्याने बहुतांश राजकीय कार्यकर्ते त्यात व्यस्त असल्याने हरकती कमी असल्याचे सांगण्यात येत आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महापालिका निवडणुकीसाठी २२ आगस्टला प्रारूप प्रभाग रचना जाहीर केली. त्यानंतर ४ सप्टेंबरपर्यंत हरकती सूचना मागविण्यासाठी मुदत आहे. २०२२ च्या वेळी तीन सदस्याची प्रभाग रचना होती. तेव्हा अडीच हजारापेक्षा जास्त हरकती नोंदविल्या गेल्या होत्या. त्या तुलनेत यावेळी हरकती व सूचना कमी आल्या आहेत. ही प्रभाग रचना भाजपच्या फायद्याची असल्याचा आरोप महायुतीतील घटक पक्षांसह महाविकास आघाडीकडून केला जात आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी तर हरकती सूचना नोंदविण्यासाठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी केली आहे.

पुण्यात सध्या गणेशोत्सवाची धामधूम सुरु आहे. राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, इच्छुक उमेदवार हे गणेशोत्सवाच्या कामात व्यस्त आहेत. त्यामुळे हरकती सूचना नोंदविण्याकडे दुर्लक्ष झाले आहे. पण अंतिम टप्प्यात या हरकती, सूचना नोंदविण्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

### हरकती, सूचनांचे स्वरूप

- प्रभागांचे नाव बदला
- एक सोसायटी दोन प्रभागात विभागली जाणे
- नैसर्गिक हद्दी ओलांडून प्रभाग रचना केली आहे
- प्रभाग मोठा झाल्याने क्षेत्रीय कार्यालय जवळचेच असावे
- प्रभाग मोठा झाल्याने प्रभागाचा काही भाग दुसऱ्या प्रभागाला जोडावा
- समाविष्ट गावांची ओळख होईल असे प्रभागाचे नाव असावे

### अधिकाऱ्यांची मागणी

- पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रशासनाकडून लगबग सुरु झाली आहे. यासाठी महापालिकेच्या निवडणूक शाखेकडून विभागीय आयुक्तांकडे १७ मुख्य निवडणूक अधिकारी व ३४ सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांची मागणी केली आहे.

पुणे महापालिकेची प्रभाग रचना ४ ऑक्टोबर पूर्वी अंतिम होणार आहे. यामुळे ती जाहीर होताच निवडणुकीची प्रक्रिया पुढे जाण्याच्या दृष्टीने या अधिकाऱ्यांची नियुक्ती महत्त्वाची ठरणार आहे. पुणे शहरात ४१ प्रभाग असून, यातील ४० प्रभाग हे चार सदस्यांचे तर एक प्रभाग पाच सदस्यांचा आहे. ही संख्या लक्षात घेऊन अधिकाऱ्यांची मागणी केली आहे.

# चाकणसह परिसरातील अतिक्रमणे हटवा

## वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आवाहन; 'पीएमआरडीए'कडून उपाययोजना




**पुणे | प्रतिनिधी**

चाकणसह परिसरात होणारी वाहतूक कोंडी दूर करण्याच्या अनुषंगाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) माध्यमातून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी या भागातील अतिक्रमणांचा सर्व्हे करण्यात येत असून, संबंधितांनी अनधिकृत बांधकामे अथवा अतिक्रमणे तातडीने काढून घ्यावेत, अन्यथा कारवाई करण्याचा इशारा प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिला आहे.

वाढत्या अतिक्रमणामुळे चाकण एमआयडीसीसह परिसरात वाहतूक कोंडी होत असल्याने वाहनधारक व नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी 'पीएमआरडीए'च्या अनधिकृत बांधकाम व निर्मूलन विभागाच्या माध्यमातून या भागातील प्रस्तावित रस्ता रुंदीनुसार जागेवर मार्किंग करण्यात येणार आहे.

आगामी आठवडाभरात संबंधित अनधिकृत बांधकामे, तसेच अतिक्रमणांवर कारवाई करण्यात येणार असल्याने संबंधितांनी आपली अतिक्रमणे स्वतःहून काढून घेत प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. चाकण परिसरातील कोंडी कमी करण्यासाठी समांतर रस्त्यांचे जाळे विकसित करण्याच्या अनुषंगाने भर देण्यात येत आहे.

काही रस्ते अरुंद असल्याने ते रुंद करण्याच्या अनुषंगाने नवीन रस्त्यांची आखणी करण्यात येत आहे. पुणे-नाशिक रस्ता, तळेगाव-चाकण शिक्रापूर रस्ता, नगरपालिका क्षेत्र व नवीन प्रस्तावित रस्त्यांच्या परिसरातील अस्तित्वातील नाले बुजविण्यात आले, ते संबंधितांनी खुले करावे, असे आवाहन त्यांनी केले.

### संबंधितांवर गुन्हा नोंदवणार

- चाकण भागातील अतिक्रमणांचा सर्व्हे करण्यात येणार असून, संबंधित अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे काढण्यात येणार आहेत. प्रशासनाच्या माध्यमातून काढण्यात आलेली अतिक्रमणे जर संबंधितांनी पुन्हा केली, तर त्यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात येणार असल्याचे डॉ. म्हसे यांनी सांगितले.